Maharashtra State Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

**तातडीचे/परीक्षा प्राधान्य/कालमर्यादित**

क्र./कोविमं/माध्य.गोप./पॅनेल २०२४-२५/3514
कोल्हापूर-०४
दि. १३/११/२०२४

प्रति,

मुख्याध्यापक,
मान्यताप्राप्त सर्व माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

**विषय : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) मार्च २०२५ परीक्षेकरिता परीक्षक / नियामक नेमणुकीसाठी तयार करावयाच्या पॅनेलबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) मार्च २०२५ परीक्षेसाठी परीक्षक/नियामक नेमणुकीसाठी पॅनेल तयार करावयाचे आहे. त्यानुसार आपल्या शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांची माहिती अद्ययावत करण्याचे मंडळाने निश्चित केले असून त्यासाठी आपल्या शाळेतील या कार्यालयास यापूर्वी सादर केलेल्या शिक्षक माहितीच्या आधारे आपल्या शाळेतील शिक्षकांची संगणकीय माहिती या पत्रासोबत विहीत नमुन्यात आपणांकडे पाठविली आहे. सदर यादीमध्ये विषयाचा सांकेतिक क्रमांक व नाव, शिक्षकाचे नाव, सेवानिवृत्ती दिनांक, परीक्षक, नियामक यांचे कामकाजाचे टर्न, शिकविण्याचा अनुभव, फोन नं., बँक खाते क्रमांक व आयएफएससी कोड इत्यादींचा यादीत समावेश केला आहे.

- **यादीबाबत आपण खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे :**

१) सदरची यादी ही गतवर्षीच्या माहितीवर आधारित आहे. सदर यादीची पडताळणी करता आपल्या/काही शाळेतील उर्वरित शिक्षकांच्या नावाचा समावेश यामध्ये झाला नसल्याचे निदर्शनास येत असल्यास अशा विषयासाठी रिकामी जागा सोडण्यात आली असून आपण त्याजागी इ.१० वी ला शिकवणाऱ्या त्या विषयाच्या उर्वरित शिक्षकांची माहिती तांबड्या बॉलपेनने विहीत नमुन्यात नोंद करावी. सदरची नोंद करताना एकाही 'पात्र शिक्षकाचे नाव नोंदवावयाचे राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) यादीतील शिक्षकांच्या नावामध्ये दुरुस्त्या असल्यास उदा. नावातील स्पेलिंग दुरूस्ती, सेवानिवृत्ती दिनांक, परीक्षक/नियामक यांचे टर्न, शिकवण्याचा अनुभव, त्या शिक्षकांचे विषय कोड, माध्यमाचे कोड उदा. मराठी माध्यम (०२), इंग्रजी माध्यम (०१), कन्नड माध्यम (०४), उर्दू माध्यम (०५), हिंदी माध्यम (०८) व फोन नंबर यामध्ये काही दुरुस्त्या असल्यास त्या लालशाईने त्याच पॅनेल फॉर्ममध्ये त्याच जागी नोंदवाव्यात.

३) अर्धवेळ, तासिका तत्वावरील शिक्षण सेवक अशा शिक्षकांची माहिती पाठवितांना नोंदी करण्यासाठी हिरव्या शाईचा वापर करावा.

४) मार्च २०१६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेपासून विज्ञान विषयांचे दोन स्वतंत्र पेपर घेण्यात येत असल्याने विज्ञान विषयाच्या शिक्षकांच्या नावासमोर विज्ञान भाग-१ व विज्ञान भाग-२ असे स्वतंत्रपणे नमूद करावे.

५) आपल्या शाळेत एकच शिक्षक अनेक विषय शिकवित असल्यास अशा शिक्षकांची सर्व विषयांसाठी माहिती पाठवावी. मात्र त्यास कोणत्या विषयासाठी नियुक्ती हवी आहे त्या विषयासमोर शेरा या कॉलममध्ये नमूद करावे.

६) शक्यतो बीजगणित, भूमिती, विज्ञान हे विषय मराठी व इंग्रजी माध्यम अशा दोन्ही माध्यमातून शिकविणाऱ्या शिक्षकांनी यादीमध्ये इंग्रजी माध्यमासाठी प्राधान्य देवून मराठी माध्यमाऐवजी (०२) इंग्रजी माध्यम (०१) अशी दुरूस्ती दर्शवावी.

- **शिक्षकांची स्वाक्षरी घेताना खालील सूचना त्यांना अवगत करून अद्ययावत माहिती सादर करावी :**

अ) शासनाच्या म.खा.शा. सेवाशर्ती नियम १९८१ मधील सेवकाचे कर्तव्य नियम क्र.२२ (१) मधील अनुसूची (अ) मधील ४ (१८,१९) नुसार सर्व शिक्षकांना मंडळाच्या परीक्षेचे काम स्वीकारणे अनिवार्य आहे. त्यामुळे पाठविलेल्या नियुक्त्या स्वीकारणे सर्व शिक्षकांना बंधनकारक राहील याची संबंधितांना जाणीव करून द्यावी. मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील इ.१० वी साठी शिकवित असलेल्या सर्व विषयांच्या मान्यताप्राप्त शिक्षकांची नावे कळविणे बंधनकारक राहील. तसेच बऱ्याच शाळांतील मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक हे सामान्यतः इंग्रजी, गणित व विज्ञान हे विषय शिकवतात मात्र ते प्रशासकीय कारणास्तव उत्तरपत्रिका तपासणीस नकार देतात. उपलब्ध शिक्षक कमी पडल्यामुळे उत्तरपत्रिका तपासणी वेळेत होत नाही. शासन आदेशानुसार मार्च परीक्षेच्या निकालानंतर लगेच पुरवणी परीक्षा घ्यावयाची असल्याने मार्च परीक्षेची निकाल प्रक्रिया तातडीने पार पाडावी लागणार आहे. **त्यामुळे आवश्यकतेनुसार मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांना उत्तरपत्रिका तपासणीचे काम देण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

ब) जे शिक्षक परीक्षेचे काम अपरिहार्य असतांना माहिती भरण्यास टाळाटाळ करतील अगर माहिती भरणार नाहीत त्यांचेवर संस्थेमार्फत कारवाई करून त्याची माहिती या कार्यालयाकडे पाठवावी. याबाबत तत्परता दाखविण्याची जबाबदारी मुख्याध्यापक यांची राहील.

क) अपूर्ण माहिती, अर्थबोध न होणाऱ्या अगर अर्धवट माहितीच्या पत्रांबाबत होणाऱ्या संभाव्य अनिष्ठास संबंधित मुख्याध्यापक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

ड) शिक्षकांची बदली झाली असल्यास बदली ठिकाणच्या शाळेचे नाव व शाळेचा सांकेतिक क्रमांक प्रपत्रातील शेरा या कॉलममध्ये लाल शाईने नमूद करावा. बदलून आलेल्या शिक्षकाची माहिती बदलून गेलेल्या शिक्षकाच्या नावाखाली नमूद करावी.

इ) ज्या परीक्षक/नियामक यांच्यावर मंडळ शिक्षासूचीनुसार प्रतिबंधात्मक कारवाई झाली असेल तर त्यांची स्वाक्षरी न घेता त्याच प्रपत्रात लाल शाईने शेरा या कॉलममध्ये शेरा लिहून कळवावे.

ई) जे शिक्षक सेवानिवृत्त, मयत झालेले आहेत, अगर नजीकच्या काळात मे २०२५ पूर्वी सेवानिवृत्त होणार आहेत, विषय शिकवित नाहीत, गंभीर आजारग्रस्त (उदा. कॅन्सर, टी.बी., हृदयाचे ऑपरेशन) किंवा अभ्यास मंडळ सदस्य असतील अशांची माहिती शेरा या कॉलममध्ये लाल शाईने नमूद करावी. याबाबत समाधानकारक पुरावा जोडावा.

उ) यापूर्वी ज्या शिक्षकांनी प्रमुख नियामक म्हणून काम केलेले आहे अशा शिक्षकांची परीक्षक म्हणून काम करण्याची तयारी असेल तर त्यांना अनुक्रमाने आवश्यकतेनुसार काम देण्यात येईल. उपरोक्तप्रमाणे परिपूर्ण प्रपत्र भरून विहित मुदतीत मंडळाकडे सादर करावे. मंडळाकडून सदर प्रपत्राची पडताळणी आपल्या शाळेच्या वेतन पथक कार्यालयाकडील अभिलेखाशी तसेच संच मान्यतेसोबत करण्यात येणार आहे.

उपरोक्त परिपत्रक संबंधित सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून त्यावर सर्व शिक्षकांची स्वाक्षरी घ्यावी व सदरचे परिपत्रक आपल्या दप्तरी जपून ठेवावे. प्रपत्राच्या शेवटी मुख्याध्यापक यांनी नाव, स्वाक्षरी व मोबाइल नंबर नमूद करणे बंधनकारक आहे. ज्या शिक्षकांची माहिती जाणीवपूर्वक पाठविली जाणार नाही अशा संबंधित शाळेवर मंडळ नियमानुसार जरुर ती शाळा सांकेतांक काढून घेण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तरी सर्व सुचनांचे पालन करून परीक्षा सुरळीत पार पाडणेसाठी शिक्षकांची माहिती व बँक खात्याबाबतची माहिती विहित मुदतीत पाठवून मंडळास सहकार्य करावे.

**महत्वाचे :**

**वरील सूचना तथा माहिती सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणून त्यांच्याच नावासमोर स्वाक्षरी घेण्यात यावी. वरीलप्रमाणे शिक्षकांची परीपूर्ण माहिती / स्वीकृतीपत्रे कोणत्याही परिस्थितीत आपल्या शाळेच्या वितरण केंद्रावर विद्यार्थी प्रिलिस्ट सोबत स्वतंत्र पाकीटातून बुधवार, दिनांक ०४/१२/२०२४ रोजी न चुकता हस्तपोहोच जमा करावीत. उशीरा सादर केल्या जाणाऱ्या माहितीसाठी दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.**

सोबत - विहीत नमुन्यातील संगणकीय शिक्षक माहिती यादी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत : १. मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. सातारा / सांगली / कोल्हापूर
३. अधिक्षक, वेतन विभाग, वेतन विभाग कार्यालय, सातारा / सांगली / कोल्हापूर